07 MAR 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. प्रतापसिंह ग. जाधव यांना प्राचार्य कणबरकर पुरस्कार जाहीर


## शिवाजी विद्यापीठ कुलगुरू डॉ. शिर्के यांची घोषणा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांना जाहीर झाला आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत या पुरस्काराची घोषणा केली. शाल, श्रीफळ, १ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार सोहळा वितरण तारीख लवकरच जाहीर करणार असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

पुरस्काराचे यंदाचे नववे वर्ष असल्याचे सांगून डॉ. शिर्के म्हणाले, हा पुरस्कार आजपर्यंत व्यक्ती किंवा संस्थांना देण्यात आला आहे. यापूर्वी, शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव, रयत शिक्षण संस्था, निर्माते-दिग्दर्शक जब्बार पटेल, ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील, प्रा. डॉ. शिवाजीराव श्रीपती कदम यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

२०२४ चा पुरस्कार डॉ. प्रतापसिंह जाधव यांना जाहीर झाला. पत्रकारिता, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक



अशा विविध क्षेत्रांसाठी डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

**डॉ. जाधव यांचे विद्यापीठाच्या उभारणीत मोलाचे योगदान**

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी 'पुढारी'चे संस्थापक डॉ. ग. गो. जाधव यांचे मोलाचे योगदान होते, असे सांगून डॉ. शिर्के म्हणाले, १९८० पासून डॉ. प्रतापसिंह जाधव यांचेही विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीत मार्गदर्शन लाभले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने लता मंगेशकर यांना मानाची डी.लिट. पदवी प्रदान करण्यात आली. या सोहळ्यात लता मंगेशकर यांनी शिवाजी विद्यापीठात ललित कला विभाग नाही, याची खंत वाटत असल्याचे सांगितले. ही बाब ध्यानात घेऊन डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी पुढाकार घेऊन ललित कला विभाग सुरू केला.

आज हा विभाग पूर्ण क्षमतेने सुरू आहे. याशिवाय देशातील पत्रकारितेतील पहिले डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्र उभा करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. केवळ इमारत उभी न करता पत्रकारितेतील अद्ययावत ज्ञान या केंद्रात मिळावे, यासाठी त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. याबाबत ते सतत मार्गदर्शन करत असतात. शिवाजी विद्यापीठाच्या एकूणच सर्वांगीण विकासात डॉ. जाधव यांचे योगदान मोलाचे आहे, म्हणूनच त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.


पत्रकार परिषदेला कुलसचिव व्ही. एन. शिंदे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त विभागाच्या श्रीमती एस. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. सागर डेळेकर, डॉ. रामचंद्र पवार, प्राचार्य बाळासाहेब खोत, डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2024
पुण्यनगरी

# पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांना 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार'

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचा प्रतिष्ठेचा 'प्राचार्य रा. कृ. कणबरकर' पुरस्कार यंदा दै. पुढारीचे मुख्य संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह गणपतराव जाधव यांना जाहीर करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. शाल, श्रीफळ, १ लाख ५१ हजारांचा धनादेश, स्मृतिचिन्ह व मानपत्र, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, डॉ. प्रतापसिंह जाधव यांचे सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन या पुरस्कारासाठी निवड समितीने त्यांची एकमताने निवड केली आहे. शिवाजी विद्यापीठाशी त्यांचे शैक्षणिक ऋणानुबंध हे पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्यापासून आहेत. पुरस्कार वितरणाची तारीख आणि प्रमुख अतिथींचे नाव लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. पुरस्काराचे यंदाचे नववे वर्ष आहे.

पत्रकार परिषदेला कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, कणबरकर पुरस्कार समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, एसयूके-आरडीएफचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत, मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

**यापूर्वीचे सन्मानार्थी...**

यापूर्वी कणबरकर पुरस्काराने शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. आर. राव, रयत शिक्षण संस्था, निर्माते-दिग्दर्शक जब्बार पटेल, ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील, प्रा. डॉ. शिवाजीराव श्रीपती कदम यांना सन्मानित करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2024
लोकमत

# डॉ. प्रतापसिंह जाधव यांना रा. कृ. कणबरकर पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा प्रतिष्ठेचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार यंदा पुढारी वृत्तपत्र समूहाचे मुख्य संपादक, पद्मश्री डॉ. प्रतापसिंह गणपतराव जाधव यांना बुधवारी जाहीर झाला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत या पुरस्काराची घोषणा केली.



डॉ. जाधव यांचे सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन हा पुरस्कार त्यांना देण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, एक लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

पुरस्कार वितरणाची तारीख आणि प्रमुख पाहुण्यांचे नाव लवकरच जाहीर करण्यात येईल, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले. याआधी हा पुरस्कार ज्येष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. सी. एन. राव, डॉ. जब्बार पटेल, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील यांना देण्यात आला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, कणबरकर पुरस्कार समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 MAR 2024
तरुण भारत

# रा. कृ. कणबरकर पुरस्कार डॉ. प्रतापसिंह जाधव यांना जाहीर

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाकडे ठेवलेल्या ठेवीतून दरवर्षी कणबरकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुरस्कार दिला जातो. यंदाचा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार दै. पुढारीचे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांना जाहीर झाला. लवकरच शिवाजी विद्यापीठात पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत होणार, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.



प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार भाषा, साहित्य, शास्त्रे, सामाजिक व नैसर्गिक, कला, क्रीडा आणि समाजसेवा करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना दिला जातो. शिक्षण, कला, क्रीडा, वृत्तपत्र, राजकारण, समाजकारण आदी क्षेत्रातील कार्याची दखल घेत यंदा डॉ. जाधव यांची निवड केली आहे. शाल, श्रीफळ, मानपत्र, स्मृतीचिन्ह आणि दीड लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, कणबरकर पुरस्कार समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक डॉ. सागर डेळेकर, एसयूके--आरडीएफचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत, मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

0 7 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाला 'बिझनेस इनक्युबेटर'चा दर्जा

## स्थानिकांच्या नवसंकल्पनांना मिळणार बळ; विविध सुविधांचाही लाभ

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : 'केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम (एमएसएमई) उद्योजकता मंत्रालयाने शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस सेंटरला बिझनेस इनक्युबेटर म्हणून काम करण्यासाठी यजमान संस्थेचा दर्जा प्रदान केला आहे,' अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, 'केंद्रीय एमएसएमई मंत्रालयाकडून मिळालेल्या या दर्जामुळे स्थानिक नवसंकल्पक, संशोधकांच्या कल्पना या यजमान संस्थेच्या अर्थात विद्यापीठाच्या माध्यमातून थेट मंत्रालयाकडे सादर करता येणार आहे. त्याचप्रमाणे प्रकल्प भारणी, यंत्रसामग्री विकसन आदींसाठी भरीव अर्थसाह्यदेखील होऊ शकणार आहे. नवसंकल्पनांचे विकसन आणि संवर्धनासाठी दर संकल्पनेमागे १५ लाख रुपयांपर्यंतचा निधी मंत्रालयाकडून मिळू शकतो. त्याचप्रमाणे यंत्रसामग्री, प्रकल्प उभारणी, हार्डवेअर, सॉफ्टवेअर आदी बाबींसाठीही एक कोटी रुपयांपर्यंतचे अर्थसाह्य मिळू शकते. ही सुविधा स्थानिकांना आता विद्यापीठातच उपलब्ध मिळणार असून त्यामुळे नवोन्मेषी संकल्पनांना मोठे पाठबळ लाभले आहे.'

यावेळी इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस सेंटरचे संचालक डॉ. सागर डेळेकर आणि एसयूके-आरडीएफचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत यांनी स्थानिक नवोन्मेषी नागरिक, विद्यार्थी, संशोधकांसाठी ही एक महत्त्वाची संधी असून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

### ३० दिवसांत ६६२ परीक्षांचे निकाल जाहीर

■ विद्यापीठाने हिवाळी सत्रात घेतलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या एकूण ६६२ परीक्षांचे निकाल ३० दिवसांत जाहीर करण्यात आले आहेत. त्यातील बहुतांश निकाल सरासरी १५ दिवसांमध्ये लावण्यात आले असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. निकालाअभावी विद्यार्थ्यांची पुढील प्रवेशाची, नोकरीची अडचण होऊ नये या उद्देशाने गेल्यावर्षीपासून विद्यापीठाने कमी वेळेत उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करण्याचे मॉडेल राबविण्यास सुरुवात केली. त्याचा चांगला परिणाम झाला असून ३० दिवसांमध्ये ६६२ परीक्षांचे निकाल जाहीर करता आले असल्याचे कुलसचिव डॉ. शिंदे यांनी सांगितले. निकाल लावण्याचे दिवस आणखी कमी करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न राहणार आहे. परीक्षा मंडळासाठी लागणारे एसआरपीडी तंत्रज्ञान विद्यापीठपातळीवर विकसित करण्याचे काम सुरु असल्याचे कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2024
पुण्यनगरी

# 'एमएसएमई'कडून शिवाजी विद्यापीठाला यजमान संस्था दर्जा

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची माहिती

कोल्हापूर : प्रतिनिधी

केंद्रीय सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योजकता मंत्रालयाकडून शिवाजी विद्यापीठास बिझनेस इन्क्युबेटर म्हणून कार्य करण्यासाठी यजमान संस्थेचा दर्जा प्रदान केल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय एमएसएमई मंत्रालयाकडून मिळालेल्या या दर्जामुळे स्थानिक नवसंकल्पक, संशोधकांच्या कल्पना या यजमान संस्थेच्या अर्थात शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून थेट मंत्रालयाकडे सादर करण्यात येऊ शकणार आहेत. त्याचप्रमाणे प्रकल्प भारणी, यंत्रसामग्री विकसन आदींसाठी भरीव अर्थसाह्यही होऊ शकणार आहे.

नवसंकल्पनांचे विकसन आणि संवर्धन यासाठी दर संकल्पनेमागे १५ लाखांपर्यंतचा निधी मंत्रालयाकडून मिळू शकतो. त्याचप्रमाणे यंत्रसामग्री, प्रकल्प उभारणी, हार्डवेअर, सॉफ्टवेअर आदी बाबींसाठीही एक कोटीपर्यंतचे अर्थसाह्य मिळू शकते. ही सुविधा स्थानिकांना आता शिवाजी विद्यापीठातच उपलब्ध करण्यात येणार असून, त्यामुळे नवोन्मेषी संकल्पनांना मोठे पाठबळ लाभले आहे.




### नवोन्मेषी संकल्पनांना पाठबळ..

यावेळी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इन्क्युबेशन व लिंकेजेसचे संचालक डॉ. सागर डेळेकर आणि एसयूके-आरडीएफचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत यांनी, स्थानिक नवोन्मेषी नागरिक, विद्यार्थी, संशोधक यांच्यासाठी ही एक महत्त्वाची संधी असून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2024
तरुण भारत

# इनोव्हेशन, इंक्युबेशन, लिंकेजिसला यजमान संस्था म्हणून मान्यता

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती

कोल्हापूर : केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयमार्फत शिवाजी विद्यापीठातील इनोव्हेशन, इंक्युबेशन आणि लिंकेजिस केंद्रास यजमान संस्था म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. हे विद्यापीठाच्या दृष्टीने अतिशय अभिमानाची बाब असून यामुळे विद्यापीठाच्या नाविन्यता व उद्योजकतेला गती येणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, उद्योग मंत्रालयाच्या विविध नवकल्पना व उद्योजकता वाढीच्या योजनांचा लाभ विद्यापीठास होणार आहे. संशोधन आणि उद्योजक वाढीस आवश्यक भौतिक सुविधा, यंत्रसामग्री उभारणी व इतर गोष्टीं उद्योग मंत्रालयातर्फे उपलब्ध होतील. सर्व घटकांनी याचा फायदा घ्यावा, हे केंद्र इनोव्हेशन आणि स्टार्टअप हब बनण्यास सहकार्य करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, प्राचार्य डॉ. बी.ए. खोत, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. शिवाजी जाधव, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

0 7 MAR 2024

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Shivaji University receives antique coin collection from PhD research scholar

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur's (SUK) museum complex added a rare collection of 40 coins from various dynasties between the 13th and 16th century on Tuesday.

The coins, originally belonging to the university's PhD research scholar Afsana Maneri, has now become a valuable donation to the institute.

"SUK's research students are adding intellectual property to the university through their research. But beyond that, some other reference materials and objects are also added to the university's collection. The coins are a very valuable donation among them," said SUK vice-chancellor Dr Digambar Shirke.

Pic courtesy: Alok Jatrakar



A video grab of the 40 coins; most of them come from the Bahmani era

Maneri has completed her PhD research on 'Development of Numismatics e-Content Module for Secondary to Post Graduate Level' under the guidance of Dr Pratibha Patankar under the department of education.

During her research, she came across 40 rare coins, all bearing Persian text, from the medieval period.

The coins weigh from 1.6 to 16 grams.

"There are 13 coins from the Bahmani sultante (1347-1528), nine coins from the Mughal period (1235-1517), five coins from the Adilshahi dynasty (1558-1672), four coins from the Nizamshahi dynasty (1556-1631), two coins each from the Govalkonda (1626-1687), Gujarat Sultan (1411-1537) and Malwa Sultan (1436-1557) eras, and one coin each from the Bidarshahi (1504-1542), Khandesh Sultan (1597-1601) and Jaunpur Sultan (1440-1456) eras," added Dr Shirke.

At the handover ceremony in Shirke's office, Maneri gave her collection to the vice-chancellor, who then handed the coins to coordinator of the university's museum complex Dr Shrikant Bhosale. Coin researcher Naeem Sheikh, pro vice-chancellor Dr Pramod Patil, registrar Dr Vilas Shinde, director of innovation, incubation and linkages center Dr Sagar Delekar, head of education department Dr Pratibha Patankar, Dr Shrikant Bhosle were present during the occasion.

जनसंपर्क कक्ष

0 7 MAR 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुन्हा रंगणार राजर्षी शाहू संगीत रजनी

## शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन; १४ मार्च रोजी प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : 'शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे बावीस वर्षांनी पुन्हा राजर्षी शाहू संगीत रजनीचा प्रारंभ होणार आहे. पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात १४ आणि १५ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजता संगीत रजनी होणार असून, त्यात कोल्हापूर जिल्हा आणि परजिल्ह्यातील नामवंत कलाकार सहभागी झाले आहेत,' अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख विनोद ठाकूर-देसाई यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

सन १९९१ ते २००२ अशी सलग बारा वर्षे या संगीत रजनीचे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी, गानसरस्वती किशोरी आमोणकर, पंडित राजन-साजन मिश्रा, उस्ताद रशीद खान आदी दिग्गज आंतरराष्ट्रीय कलाकारांनी त्यांची गानकला सादर केली. ही गायनाची परंपरा पुढे अखंडित राहावी, या उद्देशाने राजर्षी शाहू संगीत रजनी पुन्हा सुरू करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

या दोनदिवसीय संगीत रजनी चार सत्रांमध्ये होणार असून, त्यात कोल्हापुरातील आणि बाहेरील नामवंत कलाकार सहभागी होणार आहेत. १४ मार्च रोजीच्या पहिल्या सत्रामध्ये पुण्याचे कृष्णा साळुंके आणि रोहीत खवळे यांचा 'पखवाजरंग' हा पखवाजवादनाच्या जुगलबंदीचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या सत्रामध्ये कोल्हापुरातील प्रसिध्द हार्मोनियम वादक पंडित गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणारा 'गुणीगोविंद' कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये निर्मिते संगीताचार्य पं. सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी, गौरी पाटील यांचे गायन होणार आहे. १५ मार्च रोजीच्या पहिल्या सत्रात कोल्हापुरातील नवोदित शास्त्रीय गायिका गौतमी चिपळुणकर, तर दुसऱ्या सत्रात पुणे येथील आंतरराष्ट्रीय किर्तीच्या गायिका अनुराधा कुबेर यांचे गायन होणार असल्याचे ठाकूर-देसाई यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 MAR 2024
लोकमत

# विद्यापीठातर्फे १४ मार्चपासून राजर्षी शाहू संगीत रजनी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे येत्या १४ व १५ मार्चला राजर्षी शाहू संगीत रजनीचे आयोजन केले आहे. दररोज सायंकाळी ५:३० वाजता पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात हा कार्यक्रम होईल.

१९९१ ते जवळजवळ २००२ अशी सलग १२ वर्षे या संगीतरजनीचे संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजन केले होते. यामध्ये भारतरत्न पंडित भीमसेन जोशी, किशोरीताई आमोणकर, पंडित राजन साजन मिश्रा, उस्ताद रशीद खान यांसारख्या दिग्गज कलाकारांनी गानकला सादर केली होती. या संगीत रजनीत १४ मार्चला पहिल्या सत्रामध्ये पुण्याचे कृष्णा साळुंके व रोहित खवळे यांचा पखवाज वादनाच्या जुगलबंदीचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या सत्रामध्ये प्रसिध्द हार्मोनियम वादक पंडित गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणारा गुणीगोविंद हा कार्यक्रम होईल. यामध्ये सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी व गौरी पाटील यांचे गायन होईल. १५ मार्चला प्रथम सत्रात कोल्हापुरातील गौतमी चिपळुणकर तर द्वितीय सत्रामध्ये विदुषी अनुराधा कुबेर (पुणे) यांचे गायन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 MAR 2024 सकाळ

# शाश्वत विकास नियोजनासाठी कुशल मनुष्यबळ

## शिवाजी विद्यापीठात दोन नवे अभ्यासक्रम; विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. ६ : ग्रामीण, शहरीभागाचा शाश्वत विकास साधण्यासाठी धोरण, नियोजन महत्त्वाचे आहे. त्यासाठी आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ घडविण्याचे पाऊल शिवाजी विद्यापीठाने टाकले आहे. विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमध्ये मास्टर ऑफ सोशल वर्क इन पब्लिक पॉलिसी अँड गव्हर्नन्स विशेष, तर डिप्लोमा इन अर्बन पॉलिसी, प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट हा स्वतंत्र अभ्यासक्रम सुरू होणार आहे. त्याला अधिसभा या अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे.

शासनातील धोरणे आणि त्याची अंमलबजावणी, शाश्वत विकासासाठी सार्वजनिक धोरण, प्रशासनाचे महत्त्व मोठे असल्याने आणि त्यासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेची समस्या कायम आहे. या मनुष्यबळाला वाढती मागणीदेखील आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचे टाकलेले पाऊल विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांच्या धोरणात्मक विकासाच्यादृष्टीने उपयुक्त ठरणार आहे.

### जूनपासून अभ्यासक्रम सुरू व्हावा

■ रोजगार आणि शाश्वत विकासात या दोन्ही अभ्यासक्रमांच्या माध्यमातून चांगले योगदान विद्यापीठाला देता येणार आहे. त्यादृष्टीने विद्यापीठाने तांत्रिक बाबींची पूर्तता करून जूनमधील नव्या शैक्षणिक वर्षापासून या अभ्यासक्रमांची सुरुवात करावी, अशी मागणी विद्यापीठ वर्तुळातून होत आहे.

### शाश्वत विकासाला हातभार लागणार

'धोरण, नियोजन आणि त्याच्या अंमलबजावणीसाठीची पदव्युत्तर पदवी, पदविका अभ्यासक्रम टाटा इन्स्टिट्यूटसारख्या मोजक्याच संस्थांमध्ये उपलब्ध होते. आता हे अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठात सुरू होणार आहेत. त्याबाबत मी अधिसभेत मांडलेला ठराव मान्य झाला आहे. या अभ्यासक्रमांचा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होऊन या जिल्ह्यांच्या शाश्वत विकासात हातभार लागणार असल्याची प्रतिक्रिया अधिसभा सदस्य अॅड. अभिषेक मिठारी यांनी व्यक्त केली.

0 7 MAR 2024 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठात इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागामार्फत राष्ट्रीय विज्ञान दिन उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी गोवा विद्यापीठाचे प्रा. डॉ. राजेंद्र गाड यांनी विकसित भारतासाठी भारतीय तंत्रज्ञान यावर बीजभाषण केले. समन्वयक डॉ. एम. के. भानारकर यांनी प्रास्ताविक केले. विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. के. गायकवाड यांनी स्वागत केले.

दरम्यान, राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून ग्रंथालयामार्फत पुस्तक प्रदर्शन आयोजित केले होते. पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रा. सचिन शर्मा आणि डॉ. एम. के. भानारकर व विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. के. गायकवाड यांच्या हस्ते झाले.

यावेळी डॉ. सागर डेळेकर, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

0 7 MAR 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आपत्ती निवारण फौज तयार होणार

## ■ अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

मानव जातीला निसर्गनिर्मित, मानवनिर्मित व अनिश्चित अशा संकटांना अर्थात आपत्तींना सामोरे जावे लागते आहे. अशावेळी आपत्तीपूर्व व आपत्तीनंतरचे निर्माण होणाऱ्या समस्या व प्रश्न सोडवणे आवश्यक असते. मनुष्याचे जीवन सुरक्षित व सुखकर होण्यासाठी सर्व समस्यांचा स्वतंत्र अभ्यास व व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतलेली व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे. अशावेळी शिव सहाय्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्राच्या माध्यमातून स्वतंत्र आपत्ती निवारण फौज निर्माण होत आहे, असे मत डॉ. महादेव देमुख यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील शिव सहाय्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष ,वन विभाग कोल्हापूर आणि अग्निशमन विभाग कोल्हापूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. देशमुख म्हणाले, सर्व अर्थांनी उत्तमरीत्या प्रशिक्षित असणारी यंत्रणा-शासकीय, सांघिक, सामाजिक व वैयक्तिक पातळीवरही असणे हे खूप महत्त्वाचे आहे. किंबहुना ही 'काळाची गरज' आहे. आपत्ती व्यवस्थापनातील धोका, असुरक्षितता, जोखीम इत्यादी संकल्पना आणि तयारी कशी आहे. आपत्तीच्या काळात आणि नंतरचा प्रभाव कमी करण्यासाठी आपत्तीपूर्व कालावधी उपयुक्त ठरू शकतो. शिव सहाय्यता आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे समन्वयक डॉ. एस. एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी मार्गदर्शन केले.

कोल्हापूर उपवनसंरक्षक जी. गुरुप्रसाद यांनी नुकत्याच शेंडा पार्क येथील मानवनिर्मित वणव्यामुळे जी वृक्षसंपदा आगीच्या जळाली याविषयी माहिती दिली. वन परिक्षेत्र अधिकारी करवीर रमेश कांबळे आदींनी वनवणवा रोखण्यासाठी उपाययोजना याविषयी माहिती दिली. वणवा विझविण्याच्या संशोधनाबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली.

यावेळी डॉ . एस .एन सपली, रमण कुलकर्णी , सत्यजीत देसाई यांनी मार्गदर्शन केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे यांनी तत्काळ मेडिसिनसंदर्भात . माहिती दिली. जीव रक्षक दिनकर कांबळे यांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. महानगरपालिकेतील अग्निशमन दलातील जवानांनी फायर फायटर व्हॅन व फायर एस्टींग्विशरची प्रात्यक्षिक करून दाखवले व सहभागी मुलांकडून त्याचा सराव घेण्यात आला. यावेळी अमोल कुलकर्णी, सुजित मुंढे, सुरेखा आडके यांच्यासह २२५ प्रशिक्षणार्थींनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 MAR 2024
सकाळ



वारणानगर : वारणा महाविद्यालयातील कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. आरिफ महात. सोबत प्राचार्य डॉ. ए. एम. शेख, संयोजक प्रा. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, वक्ते डॉ. रमेश खबाले आदी.

# प्रत्येकाने कौशल्य आत्मसात करावे : डॉ. रमेश खबाले

## वारणा विद्यालयात हिंदी कार्यशाळा

■ **सकाळ वृत्तसेवा**

वारणानगर, ता. ६ : 'हिंदी भाषेच्या माध्यमातून श्रवण, भाषण, वाचन, लेखन कौशल्य विकसित केल्याशिवाय उत्तम वक्ता, निवेदक, सूत्रसंचालक किंवा अन्य क्षेत्रांत रोजगार - नोकरी प्राप्त करणे शक्य नाही. बदलत्या काळात प्रत्येकाने एकतरी कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे,' असे मत डॉ. रमेश खबाले (मलकापूर) यांनी येथे व्यक्त केले.

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय उपक्रमांतर्गत हिंदी विषयातील 'हिंदी भाषा, कौशल्य, रोजगार' आणि हिंदी गझल, शेरो-शायरी आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया', विषयावर कार्यशाळेत ते बोलत होते. डॉ.आरिफ महात (कोल्हापूर) उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.ए. एम शेख होते. डॉ. आरिफ महात म्हणाले, 'हिंदी गझल शेरो-शायरी आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया'च्या माध्यमातून रोजगार मिळवणे शक्य आहे. 'इश्क' और 'जुनून', माणसांमध्ये सतत जागा झाल्याशिवाय ध्येय गाठणे शक्य नाही.' संयोजक डॉ. प्रकाश चिकुर्डेकर म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी-प्राध्यापक यांनी एकत्रित येऊन सकारात्मक दृष्टीने काही नवीन करणे गरजेचे आहे.'

प्राचार्य डॉ. ए. एम. शेख म्हणाले, 'देशभरात वेगवेगळ्या क्षेत्रांत हिंदी भाषेच्या माध्यमातून उच्चपदस्थ अधिकारी होण्याची संधी आहे त्याचा लाभ घ्यावा.' कार्यशाळेचे संयोजन हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांनी केले. समन्वयक डॉ. राजकुमार पांडव, प्रा. मोहन सनगर, डॉ. डी. आर. धेडे, डॉ. आर. बी. बसनाईक यांनी संयोजन साहाय्य केले. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. गिरीजा कोकरे-देसाई यांनी करून दिला. प्रा. मोहन सणगर यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. राजकुमार पांडव यांनी आभार मानले. यावेळी शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील करवीर, गगनबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, राधानगरी आणि संयोजक वारणा महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 MAR 2024 सकाळ

# तंत्रज्ञान, क्रीडा विभाग उपांत्य फेरीत

## गोळाफेक, लांबउडी स्पर्धा; क्रिकेट महिला प्रकारात नॅनो सायन्स तृतीय



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी शिवस्पंदन महोत्सवात झालेल्या लांबउडी स्पर्धेतील क्षण.

### शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे आयोजित शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवामध्ये आज क्रिकेट, कबड्डी, गोळाफेक, लांबउडी स्पर्धा झाल्या. त्यात तंत्रज्ञान, क्रीडा, एमबीए अधिविभागांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला.

क्रिकेट महिला प्रकारात तृतीय क्रमांक नॅनो सायन्स विभागाने मिळवला. अंतिम फेरीसाठी गणित अधिविभाग विरुद्ध इतिहास अधिविभाग यांचा सामना गुरुवारी (ता. ७) होईल. ॲथलेटिक्समधील शंभर, दोनशे, चारशे मीटर धावणे, गोळा फेक, चार बाय शंभर रिले, लांबउडी या प्रकारांतील प्रथम फेरीच्या स्पर्धा पार पडल्या. क्रिकेट मुले प्रकारात उपांत्यपूर्व फेरीसाठी ए.जी.पी.एम. अधिविभाग, गणित, तंत्रज्ञान, इतिहास, रसायनशास्त्र, क्रीडा, संगणकशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान अधिविभाग हे संघ पात्र ठरले. कबड्डी महिला प्रकारात तृतीय क्रमांक पर्यावरण अधिविभागाने मिळवला.

अंतिम फेरीसाठी तंत्रज्ञान अधिविभाग विरुद्ध गणित अधिविभाग यांच्यात गुरुवारी सामना होणार आहे. कबड्डी पुरुष प्रकारात तंत्रज्ञान अधिविभाग, क्रीडा, वाय.सी.आर. डी.सी. आणि एमबीए अधिविभाग हे संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

0 7 MAR 2024
जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बॅडमिंटनमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग प्रथम

## आदित्य सावळकर, प्रतीक्षा गोस्वामी बुद्धिबळ विजेते: शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या चार दिवसीय शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात मंगळवारी पहिल्या दिवशी झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक पटकावला, तर बुद्धिबळ स्पर्धेत क्रीडा अधिविभागाचा आदित्य सावळकर आणि तंत्रज्ञान अधिविभागाची प्रतीक्षा गोस्वामी विजेते ठरले.

शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात सोमवारी क्रीडा अधिविभागाच्या हॉलमध्ये पुरुषांच्या बॅडमिंटन स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत अठरा संघांनी सहभाग नोंदवला. तत्पूर्वी, क्रीडा अधिविभागाच्या मैदानावर क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनीही सहभाग घेत उत्साह वृद्धिंगत केला.

विद्यार्थी वसतिगृहाच्या सभागृहात पुरुष व महिला गटाच्या बुद्धिबळ स्पर्धेत पुरुष गटात एकूण ८० जणांनी, तर महिला गटात ३२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेचा निकाल असा : पुरुष गट- आदित्य सावळकर (क्रीडा अधिविभाग), धैर्यशील सरनोबत (तंत्रज्ञान अधिविभाग), राहुल लोखंडे (राज्यशास्त्र अधिविभाग). महिला गट : प्रतीक्षा गोस्वामी (तंत्रज्ञान अधिविभाग), पूनम वानोळे (पर्यावरण अधिविभाग), शुभांगी जगताप (पर्यावरण अधिविभाग).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2024

पुढारी

# विद्यापीठात शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी क्रिकेट महिला या प्रकारात तृतीय क्रमांक नॅनो सायन्स या विभागाने मिळवला. अंतिम फेरीसाठी गणित अधिविभाग विरुद्ध इतिहास अधिविभाग यांचा सामना दि. ७ मार्च रोजी होईल. अॅथलेटिक्समधील १०० मी., २०० मी., ४०० मी., गोळाफेक, लांब उडी या खेळ प्रकारातील प्रथम फेरीच्या स्पर्धा पार पडल्या.

क्रिकेट मुले या प्रकारात उपांत्य पूर्व फेरीसाठी ए.जी.पी.एम. अधिविभाग, गणित अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग, इतिहास अधिविभाग, रसायनशास्त्र अधिविभाग, क्रीडा अधिविभाग, संगणकशास्त्र अधिविभाग, जैवतंत्रज्ञान अधिविभाग हे संघ पात्र ठरले आहेत.

कबड्डी महिला या प्रकारात तृतीय क्रमांक हा पर्यावरण अधिविभागाने मिळवला. तरी अंतिम फेरीसाठी तंत्रज्ञान अधिविभाग विरुद्ध गणित अधिविभाग यांच्यात ७ मार्च रोजी सामना होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 MAR 2024
लोकमत

# तंत्रज्ञान, क्रीडा, उपांत्य फेरीसाठी पात्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाच्या वतीने शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सव स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी कबड्डीच्या पुरुष संघात तंत्रज्ञान अधिविभाग, क्रीडा अधिविभाग, वायसीआरडीसी अधिविभाग, एमबीए अधिविभाग हे संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले. महिला क्रिकेटमध्ये नॅनो सायन्स विभागाने तृतीय क्रमांक मिळवला. अंतिम फेरीसाठी गणित अधिविभाग विरुद्ध इतिहास अधिविभाग यांचा गुरुवारी (दि. ७) सामना होईल. क्रिकेटमध्ये उपांत्यपूर्व फेरीसाठी एजीपीएम अधिविभाग, गणित अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग, इतिहास अधिविभाग, रसायनशास्त्र अधिविभाग, क्रीडा अधिविभाग, संगणकशास्त्र अधिविभाग, जैव तंत्रज्ञान अधिविभाग संघ पात्र ठरले. कबड्डी महिला संघात 'पर्यावरण'ला तृतीय क्रमांक मिळाला.